# जनसंपर्क विभाग

जळगाव दि. १० जून (प्रतिनिधी): उद्योगाभिमुख आणि रोजगाराभिमुख उच्च शिक्षणाला चालना देण्यासाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रसायनशास्त्र प्रशाळा व केंद्र शासनाच्या प्रतिष्ठित इन्स्टिट्यूट ऑफ रबर मटेरियल्स अँड रिसर्च इन्स्टिट्यूट (IRMRI), ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने एम.एस्सी. केमिस्ट्री विथ स्पेशलायझेशन इन रबर टेक्नॉलॉजी हा नवा पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमाला दि. ८ जून रोजी झालेल्या विद्यापरिषद बैठकीत मान्यता देण्यात आली.

या नव्या अभ्यासक्रमासोबतच रसायनशास्त्र प्रशाळेतील पॉलीमर केमिस्ट्री, फिजिकल केमिस्ट्री, अॅनालिटिकल केमिस्ट्री, ऑर्गेनिक केमिस्ट्री आणि इंडस्ट्रियल केमिस्ट्री हे विद्यमान अभ्यासक्रम पूर्ववत सुरू राहणार आहेत. रबर टेक्नॉलॉजीचा समावेश झाल्यामुळे विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध रोजगार व प्लेसमेंटच्या संधींमध्ये मोठी वाढ होणार आहे. शैक्षणिक आणि औद्योगिक क्षेत्रातील दरी कमी करून विद्यार्थ्यांना उद्योगजगत व सार्वजनिक क्षेत्रामध्ये व्यापक करिअर संधी उपलब्ध करून देणे हा या संयुक्त अभ्यासक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

या अभ्यासक्रमाची रचना दोन कॅम्पसमध्ये विभागण्यात आली आहे. पहिल्या वर्षात विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या रसायनशास्त्र प्रशाळेत मूलभूत अभ्यासक्रम व प्रयोगशाळा प्रशिक्षण दिले जाईल. दुसऱ्या वर्षात विद्यार्थ्यांना आयआरएमआरआय, ठाणे येथे विशेष संशोधन, सखोल प्रात्यक्षिक प्रशिक्षण तसेच औद्योगिक दर्जाचा व्यावहारिक अनुभव मिळणार आहे.

अभ्यासक्रमाची गुणवत्ता आणि वैयक्तिक मार्गदर्शन कायम राखण्यासाठी प्रवेश क्षमता मर्यादित ठेवण्यात आली आहे. नियमित गुणवत्ता प्रवर्गासाठी १० जागा उपलब्ध असून उद्योग-प्रायोजित उमेदवारांसाठी तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी प्रत्येकी एक अतिरिक्त जागा राखीव ठेवण्यात आली आहे.

देशातील रबर आणि पॉलिमर उद्योग झपाट्याने विस्तारत असल्याने प्रशिक्षित मनुष्यबळाची मागणी वाढत आहे. या अभ्यासक्रमाचे पदवीधर अग्रगण्य टायर उत्पादक कंपन्या, ऑटोमोबाईल घटक उद्योग, पॉलिमर प्रक्रिया उद्योग, बहुराष्ट्रीय रबर उत्पादक कंपन्या तसेच सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, संरक्षण संशोधन प्रयोगशाळा आणि राष्ट्रीय चाचणी व प्रमाणन संस्थांमध्ये रोजगाराच्या आकर्षक संधी प्राप्त करू शकतील.

विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांच्या मार्गदर्शनाखाली रसायन शास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा. व्ही. व्ही. गिते, प्रा. ए. एम. पाटील आणि प्रा. डी. जी. हुंडीवाले यांनी हा अभ्यासक्रम विकसित करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले आहेत.

चालू शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून इच्छुक विद्यार्थ्यांनी पात्रता निकष व प्रवेशासंबंधी तपशील जाणून घेण्यासाठी विद्यापीठाची अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन ऑनलाइन अर्ज सादर करावेत, असे आवाहन रसायनशास्त्र प्रशाळेतर्फे करण्यात आले आहे.

**बातमी - २**

जळगाव दि. १० जून (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या ज्ञान स्त्रोत केंद्र व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून ज्ञान स्त्रोत केंद्र परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. व्ही. एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. एस. टी. इंगळे, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक प्रा. प्रवीण महाले तसेच ज्ञान स्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. चंद्रशेखर वाणी यांच्या हस्ते विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. या उपक्रमांतर्गत वड, पिंपळ यांसारख्या दीर्घायुषी व पर्यावरणासाठी उपयुक्त वृक्षांसह विविध फुलझाडांची लागवड करण्यात

कार्यक्रमास ज्ञान स्त्रोत केंद्रातील विजय आहेर, विजय पाटील, प्रवीण पाटील तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे मच्छिंद्र पाटील, कैलास औटी, शिवाजी पाटील, स्वयंसेवक, कर्मचारी, विद्यार्थी आणि विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

**बातमी क्रमांक - ३**

जळगाव दि. १० जून (प्रतिनिधी) : १२ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या योगशास्त्र विभागात आयोजित करण्यात आलेली सहा दिवसीय कॉमन योगा प्रोटोकॉल प्रशिक्षण कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. यंदाचा आंतरराष्ट्रीय योग दिन "योगा फॉर हेल्दी एजिंग" या संकल्पनेवर आधारित असून दीर्घायुष्य, प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा आणि जीवनाच्या सर्व टप्प्यांवरील सर्वांगीण कल्याणासाठी योगाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे.

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त विद्यापीठाच्या योगशास्त्र विभागामार्फत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असून त्याचाच एक भाग म्हणून दि. ४ ते ९ जून २०२६ या कालावधीत दररोज सकाळी ७ ते ८ या वेळेत ऑनलाइन व ऑफलाइन पद्धतीने कॉमन योगा प्रोटोकॉल प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आली. समाजातील विविध घटक, विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये, शैक्षणिक संस्था, विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्यापर्यंत योगाचा प्रसार करणे हा या कार्यशाळेचा प्रमुख उद्देश होता. या कार्यशाळेत डॉ. गीतांजली भंगाळे यांनी कॉमन योगा प्रोटोकॉलमधील विविध आसने, प्राणायाम व ध्यान यांचे महत्त्व सविस्तरपणे स्पष्ट केले.

कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी योगशास्त्र विभागाचे विभागप्रमुख राजेश पाटील आणि योग थेरपी विभागाच्या सहाय्यक प्राध्यापक डॉ. लीना चौधरी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी मार्गदर्शन करताना इंजि. राजेश पाटील यांनी योग ही भारतीय संस्कृतीची अमूल्य देणगी असल्याचे सांगितले. योगामुळे व्यक्तीचे शारीरिक, मानसिक, भावनिक, सामाजिक आणि आध्यात्मिक स्वास्थ्य वृद्धिंगत होते. वाढत्या स्पर्धा, ताणतणाव आणि अपेक्षांच्या युगात निरोगी जीवनासाठी योग अत्यंत उपयुक्त असून प्रत्येकाने नियमित योगाभ्यास करावा, असे आवाहन त्यांनी केले.

प्रास्ताविकात डॉ. लीना चौधरी यांनी योगशास्त्र विभागात राबविण्यात येणारे विविध अभ्यासक्रम तसेच योग-आयुर्वेद युनिटमध्ये उपलब्ध असलेल्या उपचार पद्धतींची माहिती दिली. तसेच २१ जून रोजीच्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन उपस्थितांना केले.

या प्रशिक्षण कार्यशाळेला मोठ्या संख्येने योगसाधकांनी प्रतिसाद दिला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. लिंता चौधरी, श्री. एकनाथ नन्नवरे, माधवी तायडे, रत्नाकर सोनार आणि पंकज शिंपी यांनी विशेष सहकार्य केले.

..............................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: १० जून, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता